चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत.

जिल्हा परिषद कर्मचा-यांना लागू करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन,**
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांकः रप्रस ।।96/प्र.क्र.।4/सेवा-5,
मंत्रालय, मुंबई 400032, दिनांक 3। जानेवारी ।996.

## शासन निर्णय

केंद्र शासनाने आपल्या कर्मचा-यांना चार वर्षातून एकदा, देशात कोठेही जाण्यास "रजा प्रवास सवलत" ही योजना मंजूर केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचा-यांनाही अशा प्रकारची "चार वर्षातून एकदा राज्यात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत" योजना विहित अटींच्या अधीन राहून शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक रप्रस ।।94/।84/सेवा-5, दिनांक 28 मार्च ।995 अन्वये लागू केली आहे. राज्य शासकीय कर्मचा-यांना लागू असणा-या सेवाशर्ती सर्वसाधारणपणे जिल्हा परिषदेकडील कर्मचा-यांनाही लागू करण्याचे शासनाचे धोरण राहिले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील कर्मचा-यांना "चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत" ही योजना लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

2. शासन आता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, ।96। (सन ।962 चा अधिनियम, क्रमांक 5) च्या कलम 248 च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून असे आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या ज्या कर्मचा-यांना, स्वग्राम रजा प्रवास सवलतीबाबतची शासन अधिसूचना, ग्राम विकास विभाग क्रमांक टीआरए ।065/एस, दिनांक ।2 ऑगस्ट ।97। (वेळोवेळी सुधारल्याप्रमाणे) लागू आहे, त्या जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांना, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक रप्रस ।।94/।84/सेवा-5, दिनांक 28 मार्च ।995 मधील तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात याव्यात.

3. शासन असाही आदेश देत आहे की, वरील योजनेवरील खर्च "स्वग्राम रजा प्रवास सवलत" यासाठी खर्ची घालण्यात येणा-या संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या लेखाशीर्षाखाली त्याच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची घालण्यात येतो त्या उपलेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

19 FEB 1996

नि. उ. जि. जिल्हाधिकारी

श.वि.लागवणकर,
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग.

महालेखापाल-। (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-2 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर